# जाहीर सुचना

## महाराष्ट्र जमिन महसूल संहिता १९६६ कलम ४२ ब सुधारणेच्या अनुषंगाने जाहीर शिबिरांचे आयोजन

---

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण, भाग चार, दिनांक ०५/०१/२०१७ नुसार महाराष्ट्र जमीन महसुल संहिता १९६६ चे कलम ४२ ब नुसार सुधारणा केलेली आहे. त्यानुसार अंतिम विकास योजना क्षेत्रात समाविष्ट केलेल्या जमिनीसाठी जमिन वापरातील रुपांतरणाची तरतुद केलेली आहे.

या सुधारणेच्या अनुषंगाने ज्या जमिनी निवासी, वाणिज्यीक अथवा इतर अकृषिक स्वरुपाच्या वापर विभागात आहेत, त्याबाबत सबंधित नियोजन प्राधिकारी यांचेकडून मान्य असलेल्या वापर विभागानुसार माहिती प्राप्त करुन संबंधित खातेदार यांनी शिबीरात अर्ज करुन वापर प्रयोजनानुसार त्यांच्या मालकीच्या भोगवटा वर्ग-१ जमिनीबाबत महाराष्ट्र जमिन महसूल संहिता १९६६ कलम ४२ ब अन्वये मानीव रुपांतरण होण्याच्या दृष्टीने रुपांतरीत कर व अकृषिक आकारणीची रक्कम इ. निश्चित करुन सदर रक्कम भरणा करु शकतील.

या तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणेकामी या जिल्हयातील पालघर/वसई/डहाणू/जव्हार या तालुक्यातील खालील प्रमाणे मंडळ निहाय शिबीरांचे आयोजन करणेत आले असून, वसई-विरार शहर महानगर पालिका, पालघर नगरपरिषद, डहाणू नगरपरिषद व जव्हार नगरपरिषद कार्यक्षेत्रातील खातेदार यांनी आपल्या जमिनी विविध प्रयोजनासाठी बिनशेतीमध्ये रुपांतरीत करावयाच्या असतील त्यांनी सदर शिबीरामध्ये सर्वसंबंधित कागदपत्रांसह सहभागी होऊन आपल्या जमिनी बिनशेतीमध्ये रुपांतरीत करुन घेण्याची कार्यवाही करणेकामी डॉ. प्रशांत नारनवरे, जिल्हाधिकारी पालघर यांनी आवाहन केले आहे.

| अ.क्र. | तालुका | मंडळ कार्यालयाचे नांव | दिनांक व वेळ | शिबीराचे स्थळ |
|---|---|---|---|---|
| १ | वसई | मंडळ अधिकारी, वसई सजा- कामण, ससुनवघर, जुचंद्र | १२/०२/२०१८ सकाळी-११:०० वा. | जैन मंदिर, सभागृह, चिंचोटी ता.वसई |
| २ | | मंडळ अधिकारी, वसई सजा- मालोंडे, मुळगांव, वडवली | १५/०२/२०१८ सकाळी-११:०० वा. | तहसिल कार्यालय, वसई |
| ३ | | मंडळ अधिकारी, विरार | १४/०२/२०१८ सकाळी-११:०० वा. | सार्वजनिक वाचनालय, वसई-विरार म.न.पा,विरार, ता.वसई |
| ४ | | मंडळ अधिकारी, माणिकपूर | १६/०२/२०१८ सकाळी-११:०० वा. | समाज उन्नती मंडळ, सभागृह, माणिकपूर ता.वसई |
| ५ | | मंडळ अधिकारी, मांडवी | १६/०२/२०१८ सकाळी-११:०० वा. | जैन मंदिर सभागृह, शिरसाड ता.वसई |
| ६ | | मंडळ अधिकारी, निर्मळ | १७/०२/२०१८ सकाळी-११:०० वा. | मंडळ अधिकारी कार्यालय, निर्मळ, ता.वसई |
| ७ | | मंडळ अधिकारी, आगाशी | २०/०२/२०१८ सकाळी-११:०० वा. | महानगर पालिका क्षेत्रिय कार्यालय, बोळींज, ता.वसई |
| ८ | पालघर | मंडळ अधिकारी,पालघर | १५/०२/२०१८ सकाळी-११:०० वा. | मंडळ अधिकारी कार्यालय, पालघर |
| ९ | जव्हार | मंडळ अधिकारी, जव्हार | ०९/०२/२०१८ सकाळी-११:०० वा. | मंडळ अधिकारी कार्यालय, जव्हार |
| १० | डहाणू | मंडळ अधिकारी मल्याण व डहाणू | ०७/०२/२०१८ सकाळी-११:०० वा. | दशश्री माळी हॉल, मसोली ता.डहाणू |

क्रमांक महसूल/कक्ष.१/टे.१/४२ब/कावि-२५/२०१८

दिनांक २५/०१/२०१८.

सहीxxx-

**जिल्हाधिकारी पालघर**